# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपूरी येथील तहसिल कार्यालय आणि उपविभागीय कार्यालयाची नविन प्रशासकीय इमारत बांधण्याबाबत

**(१) ३४५३ (२२-१२-२०१४). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयांतर्गत ब्रम्हपूरी येथील तहसिल कार्यालय व उपविभागीय कार्यालय हे ब्रिटीश काळात बांधण्यात आलेल्या १०० वर्ष इमारतीमध्ये सुरु असल्यामुळे सदर दोन्ही इमारती नादुरुस्त झालेल्या असून प्रशासकीय कामकाज करण्यासाठी मोठ्या प्रमाणात अडचणी निर्माण होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तहसिल कार्यालय आणि उपविभागीय कार्यालयाची नविन प्रशासकीय इमारत बांधण्यासाठी दिनांक २० सप्टेंबर, २०१२ च्या सुमारास जिल्हाधिकारी चंद्रपूर यांच्याकडे आठ कोटी रुपयांचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यता आणि निधी मिळण्यासाठी पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्ताव जिल्हाधिकारी चंद्रपूर यांच्याकडे प्रलंबित असल्याची माहिती दिनांक २५ नोव्हेंबर, २०१४ च्या सुमारास निदर्शनात आली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, ब्रम्हपूरी येथील तहलिस कार्यालय आणि उपविभागीय कार्यालयाची नविन प्रशासकीय इमारत बांधण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०७-०९-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) चंद्रपूर जिल्हयांतर्गत ब्रम्हपूरी येथील तहसील कार्यालय व उपविभागीय कार्यालयाची नविन प्रशासकीय इमारत बांधण्यासाठी अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, चंद्रपूर यांचेकडून दिनांक २० सप्टेंबर, २०१२ अन्वये रु.७२७.६६ लक्ष किंमतीचे अंदाजपत्रक तांत्रिक मान्यतेसह जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्याकडे पाठविण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही.
(४) व (५) ब्रम्हपूरी जि.चंद्रपूर येथे तालुकास्तरीय मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीचे बांधकामाच्या रु.१२४७.७६ लक्ष इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तसेच जुलै, २०१६ च्या दुसऱ्या अधिवेशनात सदर कामाचा बाब क्र.९१ अन्वये अर्थसंकल्पात समावेश करण्यात आला आहे.

---

**शासनाने चेंबूर येथील भूखंड सिटी क्र.४६९/ए हा खाजगी विकासकास पुनर्विकासासाठी दिल्याबाबत**

**(२) ६८१० (०६-०४-२०१५). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने चेंबूर येथील भूखंड सिटी क्र.४६९/ए हा खाजगी विकासकास पुनर्विकासासाठी दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भूखंडाचे एकूण क्षेत्रफळ किती व रस्ता रूंदीकरणामुळे बाधित होणाऱ्या भूखंडाचे क्षेत्र किती, रस्ता रूंदीकरणामुळे बाधित झालेल्या पात्र-अपात्र झोपडीधारकांना सदर योजनेचा लाभ देण्यात येणार आहे काय,
(३) असल्यास, सदर योजनेमुळे मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाल्याच्या तक्रारी करण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, शासन स्तरावरून झोपडीधारकांना न्याय देण्याकरिता कोणती कार्यवाही करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०७-०९-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर भूखंडाचे एकूण क्षेत्रफळ १,१३,९२४.२० चौ.मी. आहे. रस्ता रुंदीकरणामुळे बाधित होणाऱ्या भूखंडाचे क्षेत्रफळ ३२६२.८९ चौ.मी. इतके आहे. यापैकी सदर भूखंडाच्या दक्षिणेकडील बाजूस के.एन.गायकवाड मार्गाच्या रुंदीकरणातील १२९३.४४ चौ.मी. क्षेत्रफळ झोपडपट्टीने व्यापलेले आहे. रस्ता रुंदीकरणामुळे बाधित झालेल्या पात्र-अपात्र झोपडीधारकाचे पुनर्वसन करणे ही बाब या प्रकल्पाच्या वावामध्ये अंतर्भुत नाही.
(३) नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) रस्ता रुंदीकरणाचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत होणे अपेक्षित आहे. महापालिकेने रुंदीकरणाचे काम अद्याप हाती घेतलेले नाही. त्यामुळे प्रश्न उद्भवत नाही.

---

**मनोर (ता.पालघर) येथील विश्रामगृहाच्या झालेल्या दुरावस्थेबाबत**

**(३) ९०८० (१०-०४-२०१५). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनोर (ता.जि. पालघर) या विश्रामगृहाच्या दुरावस्थेबाबत सा.बां. प्रादेशिक विभाग, मुंबई यांना याबाबत चौकशीचे आदेश केव्हा देण्यात आले आहेत,

(२) तसेच सदरहू चौकशीच्या आदेशाच्या अनुषंगाने याप्रकरणी पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) अद्यापही कारवाई झाली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०७-१०-२०१६) :** (१) मनोर (ता.जि.पालघर) या विश्रामगृहाच्या दुरावस्थेबाबत चौकशीचे आदेश दि.१५/१२/२०१४ अन्वये मुख्य अभियंता, सा.बां.प्रादेशिक विभाग, मुंबई यांना देण्यात आले आहेत.

(२) मुख्य अभियंता, सा.बां.प्रादेशिक विभाग, मुंबई यांनी दिनांक २५/०२/२०१६ अन्वये अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, ठाणे यांना मंडळातील अन्य विभागाच्या कार्यकारी अभियंता यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमून चौकशी अहवाल सादर करणेबाबत कळविल्यानुसार, चौकशी अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग क्र.२, ठाणे यांचा अहवाल प्राप्त झाला आहे.

सद्य:स्थितीत मनोर (ता.जि.पालघर) येथील शासकीय विश्रामगृहाच्या विशेष दुरुस्तीची कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगांव जिल्हयातील नविन निर्माण केलेल्या तहसिल कार्यालयाचे बांधकाम पूर्ण झालेले असूनही ताबा कंत्राटदारांनी शासनाला न दिल्याबाबत**

**(४) ११६४३ (०४-०४-२०१५). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हयातील एरंडोल-पारोळा मतदार संघात नविन निर्माण केलेल्या तहसिल कार्यालयाचे बांधकाम पूर्ण झालेले असून तहसिल कार्यालयाचा ताबा कंत्राटदारांनी अजूनही शासनाला दिलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) तेथील लोकांची गैरसोय दुर करण्यासाठी या इमारतीचा ताबा त्वरीत घेणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-०९-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) सदर प्रशासकीय इमारत दि.११/०८/२०१५ रोजी उपभोक्ता खात्यास हस्तांतरीत करण्यात आलेली असून सद्य:स्थितीत इमारत वापरात आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण शहरातील वळण रस्ता गोविंदवाडी बायपास प्रकल्पांतर्गत रस्त्याची कामे संथ गतीने सुरु असल्याबाबत**

**(५) १२०३३ (०९-०४-२०१५). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण शहरातील वळण रस्ता गोविंदवाडी बायपास प्रकल्पांतर्गत रस्त्याची कामे कालावधी उलटून गेला तरीही संथ गतीने सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच प्रकल्पाअंतर्गत येथील नागरिकांचे पुनर्वसन झालेले नसून सदर काम निकृष्ठ दर्जाचे करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर रस्त्याचे काम निकृष्ट करणाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०९-२०१६) :** (१) नाही.
(२) नाही.
(३) गोविंदवाडी बायपास रस्त्यावरील तबेले हटवुन कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने जानेवारी, २०१६ मध्ये जागा महामंडळाच्या ताब्यात दिली असून त्यानुसार महामंडळाकडून सदर काम डिसेंबर, २०१६ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे. त्यामुळे वर नमुद केल्याप्रमाणे काम निकृष्ट दर्जाचे करण्यात येत असल्याची वस्तुस्थिती नसल्यामुळे कोणावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अपना सहकारी बँकेतील गैरव्यवहाराबाबत**

**(६) १४९३९ (१०-०४-२०१६). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गिरणी कामगारांच्या घामातून स्थापन झालेल्या “अपना सहकारी बँकेचे” अध्यक्ष यांच्या मनमानी कारभार, बँक फायद्यात दाखवून करण्यात आलेले लाभांश वाटप, बेभरवशी कर्ज

वाटप, भरती घोटाळा अशा अनेक तक्रारीची दखल घेऊन राज्याच्या सहकार खात्याने बँकेविरोधात चौकशी सुरू केल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्याच्या सहकार खात्याने अपना सहकारी बँकेच्या विरोधात सुरू असलेली चौकशी पुर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व चौकशी आढळून आलेल्या दोषींविरूध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१२-०८-२०१६)** :(१) हे खरे नाही.

अपना सहकारी बँक ही बहुराज्यीय सहकारी संस्था अधिनियम, २००२ नोंदणीकृत असून सदर बँकेचे निबंधक हे केंद्रीय निबंधक, सहकारी संस्था, नवी दिल्ली आहेत. केंद्रीय निबंधकांनी त्यांच्या दिनांक २९.५.२०१३ रोजीच्या पत्रान्वये सदर बँकेच्या तपासणीचे अधिकार राज्याच्या निबंधकांकडे दिले होते मात्र केंद्रीय निबंधकांच्याच दिनांक २३.१२.२०१३ रोजीच्या परिपत्रकान्वये सदर अधिकार काढून घेण्यात आलेले आहेत. त्यामुळे सदर बँकेची तपासणी सहकार विभागामार्फत करण्यात आलेली नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली जिल्हयातील औंढा नागनाथ येथे नव्याने बांधण्यात आलेल्या बसस्थानकातील गटारातील घाणीच्या पाण्यामुळे नागरीकांची होत असलेली गैरसोय**

**(७) २०८३२ (१७-०८-२०१५). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयातील औंढा नागनाथ येथे नव्याने बांधण्यात आलेल्या बसस्थानकात येण्या-जाण्याच्या मार्गावर सतत जमा होणा-या गटारातल्या घाणीच्या पाण्यामुळे चिखल सदृश्य रस्त्यावरुन नागनाथ औंढा मंदिरात जाणा-या भाविकांची व नागरिकांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.जिल्हाधिकारी हिंगोली यांनी भाविकांची गैरसोय टाळण्यासठी नागनाथ संस्थान, सार्वजनिक बांधकाम विभाग व स्थानिक ग्रामपंचायतचे संबंधित पदाधिकारी व अधिकारी यांची एकत्रित बैठक घेवून यावर उपाययोजना करण्याचे आदेश दिलेले होते हे खरे आहे काय,

(३) असल्यास, दोन कार्यालयाच्या हद्दीच्या वादांमुळे अद्याप यावर कोणतीही कारवाई झालेली नाही हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत भाविक व नागिरकांची होणारी गैरसोय दूर करण्यासाठी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०१-०८-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी दि.२०/०६/२०१६ रोजी आयोजित बैठकीवेळी दिलेल्या मौखिक सूचनेनुसार प्रश्नाधीन मार्गावर पाण्याचा निचरा होण्यासाठी पक्क्या नालीचे बांधकाम प्रगतीत आहे.
(४) अर्थसंकल्प २०१५-१६ मध्ये १ काम रु.५०.०० लक्ष किंमतीस मंजूर असून रस्त्याच्या दोन्ही बाजूस औंढा बसस्थानकासमोर ५२० मी.लांबीचे पक्क्या नालीचे बांधकाम प्रगतीत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर शहरातील रस्ते विकास प्रकल्पातील फेरमुल्यांकन करण्याबाबत

**(८) २३२३८ (१२-०८-२०१५). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.प्रकाश अबिटकर (राधानगरी), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर शहरातील रस्ते विकास प्रकल्पातील फेरमुल्यांकन करण्यासाठी शासनाने नेमलेल्या समितीने तसेच कोल्हापूर महानगरपालिकेने केलेल्या त्रयस्थ मुल्यांकनानुसार प्रकल्पाचा खर्च २०० कोटी रुपयांपेक्षा जास्त नसल्याची बाब माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे काय, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दर चारशे मीटरवर करावयाचे युटीलिटी शिफ्टींगचे कामसुध्दा कंपनीने पूर्ण केले नसल्याचे अहवालात उघडकीस आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अहवालाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०९-२०१६) :** (१) नाही.
(२) नाही. कंपनीने प्रकल्पाच्या कराराच्या तरतुदीनुसार कामात अडथळा ठरणाऱ्या जल/सांडपाणी/दुरध्वनी वाहिन्या हलविल्या आहेत.
(३) व (४) प्रकल्पाचे मुल्यांकनासाठी गठीत केलेल्या समितीचा अहवाल शासनास सादर झाला आहे. त्यानंतर पुन्हा फेरमुल्यांकनासाठी समिती गठीत करण्यात आली. याही समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून प्रकल्पाचे मुल्य निश्चित करण्यासाठी सर्व समित्यांच्या अहवालांची सखोल तपासणी करण्यासाठी नेमलेल्या समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे. दिनांक ०१.०१.२०१६ पासून कोल्हापूर शहरातील एकात्मिक रस्ते विकास प्रकल्पांतर्गत सुरु असलेले पथकरनाके बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

---

**मोखाडा तालुक्यात (जि.पालघर) सार्वजनिक बांधकाम विभागाने भूयारी गटाराचे अनावश्यक बांधकाम करुन निधीचा दुरुपयोग केल्याबाबत**

**(९) २५११५ (१४-०८-२०१५). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोखाडा तालुक्यात (जि.पालघर) गाव किंवा रहदारी असेल अशा ठिकाणी भुयारी गटाराची संकल्पना न राबविता मोखाडा सार्वजनिक बांधकाम विभागाने तालुक्यापासून ४० कि.मी. दुर असलेल्या सुर्यमाळ केवनाळे या अति दुर्गम व जंगल परिसर असलेल्या भागात रस्त्यावर भूयारी गटाराचे अनावश्यक बांधकाम करुन सुमारे २५ लाखाच्या निधीचा दुरुपयोग करण्यात आला आहे हे खरे आहे काय,

(२) उपरोक्त काम आवश्यकता नसताना केल्याने यामध्ये आर्थिक निधीचा गैरव्यवहार झाल्याचे आढळून आले आहे हे खरे आहे काय,

(३) या सर्व कामाची स्वतंत्र यंत्रणेमार्फत चौकशी करण्यात येऊन दोषीं विरुध्द कोणती कारवाई करण्यात केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-१०-२०१६) :** (१) नाही.

(२) सूर्यमाळ-केवनाळे रस्त्याचा भाग सखल असल्याने पावसाळ्यात गटार, माती व चिखलाने भरुन पावसाचे पाणी डांबरी रस्त्यावरुन वाहून रस्त्याचा डांबरी पृष्ठभाग वारंवार खराब होत असल्याने सरपंच, ग्रामपंचायत सूर्यमाळ यांनी सदर रस्त्यावर बंद गटारीचे, काम करण्याचा ठराव केला होता. या कामास ठक्करबाप्पा योजनेतून प्रशासकीय मान्यता सन २०१३ मध्ये प्रदान करण्यात आली होती. भूयारी गटारीचे मंजूरीप्रमाणे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आष्टा मोड (ता. लोहारा, जि.उस्मानाबाद) येथे रा.म.मा.९ (जुना) व नवीन ६५ या रस्त्याच्या चौपदरीकरणाबाबत**

**(१०) २६१३५ (०७-०८-२०१५). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रा.म.मा.९ (जुना) व नवीन ६५ या रस्त्याच्या चौपदरीकरणाच्या कामात सुरक्षा नियमांचा अवलंब होत नसलेल्या कारणाने दिनांक ९ एप्रिल, २०१५ रोजी सायंकाळी ५ ते ६ च्या दरम्यान सदर मार्गावर आष्टा मोड (ता. लोहारा, जि.उस्मानाबाद) येथे एस.टी.बस व ट्रक यांच्यात भीषण अपघात होऊन दोन व्यक्ती मृत व सुमारे वीस ते तीस व्यक्ती गंभीर जखमी झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर मार्गावर अशा प्रकारचे असे अनेक गंभीर अपघात होण्यास जबाबदार असणा-या सर्व संबंधितावर कायदेशीर कारवाई होणे व मृत/जखमी नातेवाईकांना जास्तीत जास्त आर्थिक मदत मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी, उमरगा-लोहारा यांनी मा.परिवहन मंत्री व मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक १० एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाव्दारे विनंती केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने संबंधितावर शासनाने कोणती कारवाई कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-१०-२०१६) :** (१) अपघात झाला हे खरे आहे.

तथापि सदरील अपघात हा विरुध्द दिशेने येणाऱ्या ट्रकचालकाने चुकीच्या बाजुने भरधावपणे ओव्हरटेक करताना झालेला असल्याचे पोलीस अधीक्षक (मुख्यालय), अपर पोलीस महासंचालक (वाहतुक), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी कळविले आहे.
(२) स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक १० एप्रिल, २०१५ च्या निवेदनाद्वारे विनंती केली आहे.

मयत झालेल्या ३ व्यक्तींच्या नातेवाईकांना प्रत्येकी १०,०००/- प्रमाणे एकूण ३०,०००/- व ३० जखमी प्रवाशांना रु.२८,५००/- असे एकूण रु.५८,५००/- ची तात्कालिक मदत देण्यात आली आहे.
(३) वाहनचालकावर गु.र.नं.९९/२०१५ अन्वये भा.दं.वि.कलम २७९,३३८७,३३८,३०४ (अ) मो.वा.कायदा क्र.१८४,१३४ (अ) व (ब) नुसार गुन्हा दाखल केला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर शहरातील आयआरबीने शहरात एकात्मिक रस्ते विकास प्रकल्पांतर्गत तयार रस्ते सदोष असल्याबाबत**

**(११) २६२५७ (०७-०८-२०१५). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर शहरातील आयआरबीने शहरात एकात्मिक रस्ते विकास प्रकल्पांतर्गत तयार केलेले १३ रस्ते सदोष आणि करारात ठरलेल्या दर्जानुसार नसल्याचे पुण्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रयोगशाळेत माहे जून २०१५ मध्ये वा त्या दरम्यान घेतलेल्या चाचणी दरम्यान उघड झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रस्ते पुनर्मुल्यांकन समितीच्या सदस्यांनी यावर आक्षेप घेत मूल्यांकन करताना याचा विचार करु नये अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-०८-२०१६) :**(१) होय.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) रस्त्याच्या काँक्रिटच्या Strength तपासणीच्या चाचण्या पुनश्च घेण्यात आल्या होत्या. अंदाजपत्रकानुसार काँक्रिट ग्रेड आढळले नसल्याने ज्या दर्जाचे काँक्रिट आढळले त्यानुसार पुनर्मुल्यांकन समितीने मुल्यांकन करताना काँक्रिटसाठी कमी दर दिला आहे.

बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्त्वावर कोल्हापूर एकात्मिक रस्ते विकास प्रकल्प राबविण्यात आला होता. पथकराला पर्याय शोधण्यासाठी शासनाने समिती गठीत केली होती व पुनर्मुल्यांकन समितीने प्रत्यक्ष केलेल्या कामाचे दर्जानुसार मुल्यांकन केले आहे. सदरहू ठिकाणची पथकर वसुली शासनाने दिनांक ०१.०१.२०१६ पासून बंद केली असून उद्योजकास द्यावयाच्या नुकसान भरपाईची रक्कम अदा करण्याबाबतची कार्यवाही प्रगतीत आहे.

---

### औरंगाबाद येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या इलेक्ट्रिक विभागातील तीन अधिका-यांनी काम न करताच ठेकेदाराला बिले दिल्याबाबत

**(१२) २६४७५ (०७-०८-२०१६). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या इलेक्ट्रिक विभागातील तीन अधिका-यांनी काम न करताच ठेकेदाराला ५३ लाख रुपयांची बिले दिल्याप्रकरणी माहे मे, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात निलंबित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांचेवर उक्त प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच सदरच्या ५३ लाखांच्या बिलाची वसूली कशाप्रकारे करण्यात येणार आहे व ठेकेदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-०९-२०१६) :**(१) सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभाग, औरंगाबाद अंतर्गत करण्यात आलेल्या दोन विद्युतीकरण करण्याच्या कामात आढळून आलेल्या अनियमितता प्रकरणी तीन अधिकाऱ्यांना दिनांक ५/२/२०१४ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे.

(२) व (३) उक्त प्रकरणी दोषी आढळून आलेल्या अधिकाऱ्यांविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ अंतर्गत विभागीय चौकशीची कार्यवाही करण्यात येत आहे. चौकशीअंती योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कळमनुरी (जि.हिंगोली) येथील वारंगा-अर्धापूर राष्ट्रीय महामार्ग क्र. १६१ वर सुरु असलेली कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची असल्याबाबत**

**(१३) ३०३०० (२२-१२-२०१५). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमनुरी (जि.हिंगोली) येथील वारंगा-अर्धापूर राष्ट्रीय महामार्ग क्र. १६१ वर सुरु असलेली कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची असल्याचे तेथील लोकप्रतिनिधींनी प्रत्यक्ष कामावर दिलेल्या भेटीच्या वेळी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना दिनांक १८ जून, २०१५ रोजी पत्र पाठवून दक्षता व गुणनियंत्रण विभागामार्फत या कामाची चौकशी करण्याची मागणी तसेच तपासणी पूर्ण होईपर्यंत कामाची देयके अदा करु नयेत अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-१०-२०१६) :** (१) स्थानिक लोकप्रतिनिधींनी उक्त कामासंबंधीचे क्षेत्रिय अधिकारी ह्यांचे समवेत प्रत्यक्ष कामास भेट दिलेली नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) होय.

अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, नाशिक यांनी या कामाची चौकशी केली असून सकृत दर्शनी केलेली तक्रार ही संयुक्तीक वाटत नाही असा अहवाल शासनास पत्र क्रं.दवगुनिमं/दना/११३/सन २०१५ दिनांक २६ नोव्हेंबर, २०१५ अन्वये सादर केला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाण्याहून बोरीवलीकडे जाण्यासाठी टिकुजीनीवाडी ते नॅशनल पार्कपर्यंत सुमारे १० कि.मी. लांबीचा बोगदा-रस्ता तयार करण्याबाबत**

**(१४) ३१४९३ (२२-१२-२०१५). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाण्याहून बोरीवलीकडे जाण्यासाठी टिकुजीनीवाडी ते नॅशनल पार्कपर्यंत सुमारे १० कि.मी. लांबीचा बोगदा-रस्ता तयार करण्याचा निर्णय राज्य शासनाने माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा बोगदा उभारण्यासाठी तज्ञ सल्लागार समिती नेमण्याचाही निर्णय शासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत सल्लागार समितीने आपला अहवाल शासनाला दिला आहे काय,
(४) असल्यास, ठाणे-बोरीवली बोगदा- रस्त्याकरीता किती खर्च येणार आहे,
(५) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील बोगदा-रस्त्याचे काम केंव्हापासून सुरु करण्यात येणार आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-०८-२०१६) :** (१) होय.
(२) होय.
(३) तज्ञ सल्लागारांची नियुक्ती करण्यासाठी निविदा प्रक्रिया सुरु आहे. केंद्रीय वन व पर्यावरण मंत्रालयाकडून सर्वेक्षण करण्यासाठी त्यांनी दिलेल्या सूचनांनुसार प्रस्ताव मुख्य वन संरक्षक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, मुंबई यांच्याकडे ०८.०६.२०१६ रोजी सादर करण्यात आला आहे. सर्वेक्षणासाठी परवानगी मिळाल्यावर सविस्तर सुसाध्यता अहवाल तयार करण्यात येईल.
(४) प्रकल्पाचा आवाका निश्चित झाल्यावर प्रकल्पाची किंमत अंतिम होईल.
(५) प्रकल्प आर्थिकदृष्ट्या सुसाध्य झाल्यास प्रशासकीय मान्यतेनंतर निधी उपलब्धतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

**सुरुते (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) गावातील रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करण्याबाबत**

**(१५) ३२५४९ (२२-०१-२०१६). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सुरुते (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) गावातील रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करण्यात न आल्याने गावातील रस्ते चिखलमय झाले असून गावातील रस्त्यांतून नागरीकांना व्यवस्थित चालता येत नसल्याचे माहे जुलै, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याची शासनामार्फत पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तदनुसार सदर गावातील रस्त्यांचे खडीकरण व डांबरीकरण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०९-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय.
(३) व (४) प्रजिमा ६८ वरील कि.मी. २३/५०० ते २३/८०० हि लांबी सुरुते गावातून जाते. या ३०० मीटर लांबीत रस्त्याच्या दुतर्फा घरे आहेत. या ठिकाणी ग्रामस्थांचा गटर बांधकामासाठी विरोध असल्याने या भागात रस्त्यावर पाणी साचून राहून रस्ता क्षतिग्रस्त झाला आहे.

या भागात रस्ता सुस्थितीत राहण्यासाठी पक्की गटारे बांधून पाण्याच्या निचऱ्याची व्यवस्था करणे आवश्यक आहे हे काम शासनाच्या निकष निधी व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

---

**आडगांव (ता.एरंडोल, जि.जळगाव) येथील स्वातंत्र सैनिकाचे स्मारकाचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत**

**(१६) ३२९४१ (१६-०१-२०१६). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आडगांव (ता.एरंडोल, जि.जळगाव) येथील स्वातंत्र सैनिकाचे स्मारकाचे काम रुपये ६० लक्ष खर्च करुनही निकृष्ट दर्जाचे झाल्यामुळे गावकऱ्यांनी सदर कामाची तात्काळ चौकशी व्हावी यासाठी दिनांक ९ ऑगस्ट, २०१५ रोजी धरणे आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामावर लाखो रुपये खर्च होऊन देखील काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचे सिध्द झाल्यावरही याबाबत चौकशी करण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सदरचे काम एक महिन्याच्या आत ठेकेदारांकडून करुन घेतो असे लेखी पत्र डेप्युटी इंजिनिअर यांनी लिहून दिले होते, परंतु सदर वेळेत कामही पूर्ण झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(५) असल्यास, तद्नुसार संबंधितांवर पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-१०-२०१६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे अंशत: खरे आहे.

(४) होय, चौकशीअंती संबंधीत उपविभागीय अभियंता व शाखा अभियंता यांनी पर्यवेक्षकीय निष्काळजीपणा केल्याचे अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, जळगांव यांचे कार्यालयास निदर्शनास आले आहे.

(५) सदर बाबत संबंधितांविरुध्द पुढील प्रशासकीय कार्यवाही अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, जळगांव यांचे कार्यालयाकडून प्रस्तावित करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे. दाबका (ता.उमरगा) या ग्रामपंचायतीच्या हद्दीतुन जाणाऱ्या महामार्गाच्या रूंदीकरणात ग्रामपंचायत मालमत्तेची नोंद घेणे व गावकऱ्यांच्या दळणवळणासाठी पर्यायी सुविधा उपलब्ध करून देणेबाबत**

**(१७) ३३८०० (२२-१२-२०१५). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे. दाबका (ता.उमरगा) या ग्रामपंचायतीच्या हद्दीतुन जाणाऱ्या महामार्गाच्या रूंदीकरणात ग्रामपंचायत मालमत्तेची नोंद घेणे व गावकऱ्यांच्या दळणवळणासाठी पर्यायी सुविधा उपलब्ध करून देणेबाबत उमरगा-लोहारा येथील लोकप्रतिनिधी यांनी मा.जिल्हाधिकारी, उस्मानाबाद व मा. प्रकल्प संचालक रा.मा ९ नवीन ६५, सोलापुर यांना दिनांक १८ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे सुचित कले होते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने कुठलीच कार्यवाही झाली नाही हे खरे आहे काय व असल्यास शासन काय कार्यवाही करणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-१०-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

प्रकल्प अहवालातील मंजूर तरतुदीनुसार सवलतकाराने "दाबका" गावाच्या हद्दीत रस्त्याच्या पातळीत नाका (At Grade Junction) बांधण्यात आला असल्याचे प्रकल्प संचालक भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, सोलापूर यांनी कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देवळा तालुक्यात (जि. नाशिक) सर्व विभागांचे कर्मचारी हे मुख्यालयी न राहता आदिवासी प्रोत्साहन भत्ता व मुख्यालयी राहण्यासाठी मिळणारे घरभाडे घेऊन शासनाची फसवणूक करत असल्याबाबत**

**(१८) ३५७६२ (२२-१२-२०१५). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवळा तालुक्यात (जि. नाशिक) असलेली दहीवडपर्यंतची गावे आदिवासी उपयोजनेत समाविष्ट असून तालुक्यातील सर्व विभागांचे अनेक कर्मचारी हे मुख्यालयी न राहता आदिवासी प्रोत्साहन भत्ता व मुख्यालयी राहण्यासाठी मिळणारे घरभाडे घेऊन शासनाची फसवणूक केली जात असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार संबंधीत कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री. विष्णु सवरा (०९-०९-२०१६)** :(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शहापूर तालुक्यातील (जि.ठाणे) तहसील कार्यालयाच्या प्रशासकीय भवनाला प्रशासकीय मंजुरी दिल्याबाबत**

**(१९) ३५९१८ (०८-०१-२०१६). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापूर तालुक्यातील (जि.ठाणे) तहसील कार्यालयाच्या प्रशासकीय भवनाला सन २००९ मध्ये प्रशासकीय मंजूरी देण्यात आलेली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ६ वर्ष होऊनही निधी न मिळाल्यामुळे कोणत्याच कामाला सुरुवात झाली नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यांची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, प्रशासकीय भवनाचे काम सुरु करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ६ जुलै, २०१५ रोजी पुन्हा लेखी निवदनाद्वारे मा.महसूल मंत्री यांच्याकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असलयास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीअंती कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?
(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-१०-२०१६) :** (१) खरे आहे.
(२) खरे आहे.
(३) सदर इमारत बांधणेसाठी जागा उपलब्ध नसल्याने काम सुरु करण्यात आले नाही.
(४) खरे आहे.
(५) या अनुषंगाने जिल्हाधिकारी, ठाणे यांना शासनास प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दि.२४.०८.२०१५ च्या महसूल विभागाच्या पत्रान्वये देण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालेगाव तालुक्यातील (जि.वाशिम) आदिवासी परिक्षेत्रातील रस्त्यांची झालेली दुरवस्था**

**(२०) ३८१२८ (२२-१२-२०१५). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगाव तालुक्यातील (जि.वाशिम) आदिवासी परिक्षेत्रातील रस्त्यांची गत २० वर्षापासून सुधारणा व देखभाल करण्यात आली नसल्यामुळे वाहतुकीसाठीची अवस्था अत्यंत खराब झाली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उमरवाडी, मुसळवाडी, कोलदरा, सावळद, जोगलदरी, वाकळवाडी, उकंकरवाडी, पाचेमार्ग तसेच मेडशी ते भौरद, मालेगाव, न.किन्ही ते धरमवाडी, मांगवाडी ते आदिवासी झोपडपट्टी, रिसोड ते घोसरवाडी या रस्त्यांची सुधारणा करणेबाबत मा.लोकप्रतिनिधींनी मा.आदिवासी विकास मंत्री यांना माहे ऑक्टोबर, २०१५ रोजी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त रस्त्यांची देखभाल दुरुस्ती व सुधारणा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०६-०९-२०१६) :** (१) व (२) मालेगाव तालुक्याच्या आदिवासी क्षेत्रातील रस्त्यांची दुरावस्था झाली असल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मंत्री (आदिवासी विकास) यांना दिनांक ०६.१०.२०१५ च्या पत्रान्वये कळविले आहे.

(३) वरीलप्रमाणे विनंती करण्यात आलेल्या ११ कामांपैकी रु.१५०.०० लक्ष किंमतीच्या ५ कामांना मार्च, २०१६ च्या अर्थसंकल्पामध्ये मंजूरी देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वाशिम येथील निकृष्ट बांधकामामुळे कोसळलेल्या जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या इमारतीच्या बांधकामाची चौकशी सुरु असल्याबाबत

**(२१) ३८७१४ (२२-१२-२०१५). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम येथील निकृष्ट बांधकामामुळे कोसळलेल्या जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या इमारतीच्या बांधकामाची चौकशी सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर चौकशीत काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, त्यानुसार दोषी आढळलेल्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-१०-२०१६) :** (१) व (२) स्त्री रुग्णालयाच्या इमारतीचे पोर्चचे स्लॅबचे काम चालु असताना सेंट्रींग मधील एका सपोर्टचे स्ट्रट रिंग तुटल्याने त्या ठिकाणच्या स्लॅबला बाक आला होता, हे खरे आहे.

पुढील धोका टाळण्यासाठी संबंधित कंत्राटदाराने काम थांबवून तातडीने संपूर्ण सेंट्रींग व उभारलेले स्टील JCB मशिनच्या सहाय्याने काढून टाकला आहे.

सदर घटनेबाबत अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अकोला यांचेकडून दि.२५/०९/२०१५ रोजी प्राथमिक चौकशी करुन प्रारंभिक अहवाल मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, अमरावती यांना त्यांचेमार्फत दि.१८/०१/२०१६ रोजी सादर करण्यात आला असून सदर बाबतीत पुढील चौकशी प्रगतीत आहे.

(३) चौकशीअंती संबंधितांवर प्रशासकीय कारवाई करणेत येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली आदिवासी प्रारुप आराखडयामध्ये वैयक्तिक लाभाच्या कृषि व फलोत्पादन नवीन विहिर घटकासाठी अनुसूचित जमातीतील लाभार्थी अनुदानापासून वंचित असल्याबाबत**

**(२२) ४१३४२ (२९-०४-२०१६). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली आदिवासी प्रारुप आराखडयामध्ये वैयक्तिक लाभाच्या कृषि व फलोत्पादन नवीन विहिर घटकासाठी जिल्हयातून अनुसूचित जमातीतील १४२ लाभार्थी अनुदानापासून वंचित राहत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त लाभार्थी अनुदानापासून वंचित राहू नये यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२०-०९-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.

सन २०१५-१६ मध्ये जिल्हयातुन ३४५ पात्र लाभार्थ्यांचे प्रस्ताव सदर योजनेसाठी आले होते. तथापि जिल्हयासाठी मंजुर निधी केवळ १५०.०० लक्ष असल्याने २०३ लाभार्थ्यांची निवड करण्यात आली होती. उर्वरीत १४२ पात्र लाभार्थ्यांकरीता पुनर्विनियोजनाद्वारे १००.०० लक्ष अतिरिक्त निधीची मागणी करण्यात आली होती. त्यापैकी ३६.८१ लक्ष निधी प्राप्त झाल्याने पुन्हा ४७ लाभार्थ्यांची निवड केली.
(२) सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात एकूण २५० लाभार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. निधीअभावी ९५ लाभार्थ्यांची निवड करता येऊ शकली नाही. या योजनेच्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचनेनुसार प्रत्येक आर्थिक वर्षात लाभार्थ्यांची निवड करण्यात येते. मंजूर तरतूदीपेक्षा जादा प्राप्त होणाऱ्या सर्व लाभार्थींना लाभ देणे शक्य होत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मराठवाडयातील जालना-औरंगाबाद या बीओटी तत्वावरील रस्त्याचे काम बोगस कागदपत्रे सादर करुन पूर्ण झाल्याचे दर्शवून टोल वसुलीची परवानगी मिळविल्याबाबत**

**(२३) ४१६४३ (२९-०४-२०१६). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडयातील जालना-औरंगाबाद या बीओटी तत्वावरील रस्त्याचे काम बोगस कागदपत्रे सादर करुन पूर्ण झाल्याचे दर्शवून टोल वसुलीची परवानगी मिळविल्याबाबतची चौकशी

करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधिंनी दिनांक २७ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना पत्रव्यवहार करुन केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास, याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०९-२०१६) :** (१) होय.
(२) व (३) चौकशी करण्यात आली असून प्रकल्पाच्या वावात समाविष्ट असलेल्या कामांपैकी दोन रेल्वे ओव्हर ब्रीज वगळता इतर सर्व कामे दिनांक २४.०७.२००९ रोजी पूर्ण झाली होती. सदर रेल्वे ओव्हर ब्रिजच्या कामासाठी रेल्वे विभागाकडून GAD, संकल्पचित्रे, नकाशे व मेगा-ब्लॉक मिळण्यास अतिरिक्त दोन वर्षाचा कालावधी अपेक्षित असल्याने सदर कामांची किंमत वजा करुन निविदाशर्तीनुसार दिनांक २८.०७.२००९ पासून पथकर सुरु करण्यात आला आहे. आजमितीस दोन्ही पुलांचे बांधकाम पूर्ण झाले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील आदिवासी विकास विभागांतर्गत स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या अनुदानित आश्रमशाळांतील १४३३ शिक्षकांना मागील थकबाकी देण्याबाबत**

**(२४) ४२०२४ (१२-०५-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील आदिवासी विकास विभागांतर्गत स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या अनुदानित आश्रमशाळांतील १४३३ शिक्षकांना दिनांक २५ सप्टेंबर, २००६ रोजीच्या शासन निर्णयनुसार नियमित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या शासन निर्णयात कर्मचाऱ्यांची मागील थकबाकी न देता दिनांक १ डिसेंबर, २००५ रोजीपासून पुढे वेतन द्यावे असा अन्यायकारक आदेश आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अन्यायकारक आदेश रद्द करुन या शिक्षकांना मागील थकबाकी देण्यासोबतच शासन निर्णयानुसार वेतन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०६-०९-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे. शासन निर्णय दिनांक ०६ डिसेंबर, २००५ अन्वये ५९९ व शासन निर्णय दिनांक २५ सप्टेंबर, २००६ अन्वये ३५७ प्रशिक्षित व २६६ अप्रशिक्षित असे एकूण १२२२ शिक्षकांच्या नियुक्त्या नियमित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(२), (३) व (४) हे अंशत: खरे आहे. शासन निर्णय दिनांक ०६ डिसेंबर, २००५ अन्वये ५९९ शिक्षकांना दिनांक १.१२.२००५ पासून व शासन निर्णय दिनांक २५ सप्टेंबर, २००६ अन्वये ३५७ प्रशिक्षित शिक्षक व अप्रशिक्षित शिक्षकांना दिनांक ०१.१०.२००६ पासून वेतन अदा करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

---

**पापळ विकास आराखडा (ता.नांदगाव खंडेश्वर,जि.अमरावती) अंतर्गत पापळ-पिंप्री निपाणी ग्रा.मा. १५५ रस्त्याच्या बांधकामाच्या प्रस्तावाला मंजूरी देण्याबाबत**

**(२५) ४२७०९ (३०-०४-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पापळ विकास आराखडा (ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती) अंतर्गत पापळ-पिंप्री निपाणी ग्रा.मा.१५५ रस्त्याच्या बांधकामाचा प्रस्ताव मंजूर करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.जिल्हाधिकारी, अमरावती यांना दिनांक १८ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०९-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) विषयाधिन कामास जिल्हाधिकारी, अमरावती यांनी प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. सदर काम प्रगतीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने केलेल्या रिंगरोडचे सर्वेक्षणास सोरतापवाडी व परिसरातील ग्रामस्थांनी विरोध केला असल्याबाबत**

**(२६) ४२८२३ (२९-०४-२०१६). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने दिनांक २७ डिसेंबर, २०१५ रोजी पुणे शहराबाहेरुन जाणाऱ्या रिंगरोडचे उपग्रहाद्वारे (सॅटेलाईट) सर्वेक्षण सुरु केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कात्रज बाहय वळण मार्गावर मंतरवाडी ते रामदरा मार्गे थेऊरफाटा या नियोजित रिंगरोडसाठी १० वर्षापूर्वी जमीन संपादीत करुन शेतकऱ्यांना मोबदलाही दिला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने सातारा महामार्गावरील आणेवाडी टोलनाक्यापासून बापदेवघाट, दिवेघाट, आळंदी म्हातोबाची, सोरतापवाडी, पेठ, बिवरी ते नगररस्ता असे पहिल्या टप्प्यात सर्वेक्षण करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सोरतापवाडी व परिसरातील ग्रामस्थांनी या सर्वेक्षणास विरोध केला आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०९-२०१६) :** (१) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने पुणे शहराबाहेरुन जाणाऱ्या रिंगरोडचे TOTAL STATION व DRONE TECHNOLOGY ने सर्वेक्षण करणे सुरु केले आहे.
(२) होय.
(३) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून खेड शिवापूर येथील पथकर नाक्यापासून कासूर्डी, वेळू, गोगलवाडी, होळकरवाडी, वडकी, आळंदी म्हातोबाची, सोरतावाडी, पेठ, बिवरी ते नगर रस्ता, बकोरी, लोणीकंद, गोळेगाव, सोलू, आळंदी, चिंबळी, कुरळी, निघोजे, येलवाडी, इंदोरी, आंबी, उर्से असे पहिल्या टप्प्याचे सर्वेक्षण करण्यात आले आहे.
(४) होय.
(५) यासाठी जिल्हाधिकारी, पुणे व संबंधित तहसिलदार यांची मदत घेण्यात येत असून येथील ग्रामस्थांच्या व शेतकऱ्यांच्या शंका दूर करुन उर्वरित सर्वेक्षण करण्यात येत आहे.

---

**सातारा जिल्ह्यातील सातारा-लोणंद-बारामती रस्ता तसेच सातारा-कोरेगाव, माण-पंढरपूर रस्ता यांचा समावेश राष्ट्रीय महामार्गात करण्याबाबत**

**(२७) ४३१३९ (२९-०४-२०१६). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सुमारे १ लाख कोटी रुपये खर्च करून देशातील सर्व राज्यातील रस्त्यांची कामे करण्याचा केंद्र शासनाने नुकताच निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र राज्यातील या योजनेंतर्गत किती रस्त्यांचे प्रस्ताव तयार करण्यात आले आहेत व यात सातारा जिल्ह्यातील सातारा-लोणंद-बारामती रस्ता तसेच सातारा-कोरेगाव माण-पंढरपूर रस्ता याचा समावेश राष्ट्रीय महामार्गात करण्यात आला आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-१०-२०१६) :**(१) व (२) महाराष्ट्र राज्यातील एकूण ९९ राष्ट्रीय महामार्गास तत्वत: मंजूरी प्राप्त आहे. तत्वत: मंजूर राष्ट्रीय महामार्गामध्ये प्रश्नाधीन रस्त्यांपैकी सातारा-वाठार-लोणंद आणि सातारा-कोरेगाव-माण-पंढरपूर ह्या रस्त्यांचा समावेश आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कळवण (जि.नाशिक) तालुक्यातील रस्त्याची कामे न करताच ठेकेदाराने निधीत केलेला गैरव्यवहार**

**(२८) ४३६८८ (२९-०४-२०१६). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.सिध्दराम म्हेत्रे (अक्कलकोट), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळवण (जि.नाशिक) तालुक्यातील येथे रस्त्याची कामे न करताच ठेकेदाराने त्याबाबतच्या निधीत गैरव्यवहार केल्याचे माहे जानेवारीच्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार कामे न करताच निधीत गैरव्यवहार करणाऱ्या ठेकेदारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०७-०९-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) कळवण तालुक्यात झालेल्या सर्व कामांची पहाणी व सर्वसाधारण चौकशी करण्यात आली असून, त्यामध्ये काम न करताच ठेकेदाराने गैरव्यवहार केल्याची कुठलीही बाब आढळून आली नाही.

---

**कणकवली (जि.सिंधुदूर्ग) तालुक्यातील, फोंडा-घोणसरी-कुरली रस्ता प्रजिमा-६ या रस्त्याचे नुतनीकरण व डांबरीकरण करण्याबाबत**

**(२९) ४४२६० (२९-०४-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कणकवली (जि.सिंधुदूर्ग) तालुक्यातील, फोंडा-घोणसरी-कुरली रस्ता प्रजिमा-६ या रस्त्याचे नुतनीकरण व डांबरीकरण करण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधींनी मा.पालकमंत्री व ग्रामविकास मंत्री यांना दिनांक ८ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास दिलेल्या निवेदनाद्‌वारे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने उक्त रस्त्यांचे नुतनीकरण व डांबरीकरण करण्याबाबतचा प्रस्तावास मान्यता देवून व आवश्यक निधी मंजूर करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-१०-२०१६) :**(१) होय.
(२) प्रश्नांकित रस्त्याच्या कि.मी. १२/०० ते कि.मी. १३/५०० व कि.मी. २१/४५० ते कि.मी. २२/७१५ या लांबीतील डांबरी पृष्ठभागाचे नुतनीकरण करण्याचे काम पूर्ण झाले आहे. रस्त्याच्या उर्वरित लांबीपैकी काही आवश्यक लांबीतील डांबरीकरण व मजबूतीकरण करण्याची कामे मंजूरी, निधी, निकष व प्राधान्यक्रमानूसार हाती घेण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### भंडारा जिल्हयातील साकोली, लाखनी व लाखांदूर तालुक्यातील मार्ग अत्यंत खराब असल्याबाबत

**(३०) ४५१६८ (२९-०४-२०१६). श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्हयातील साकोली, लाखनी व लाखांदूर तालुक्यातील राज्य मार्ग, प्रमुख जिल्हा मार्ग (एमडीआर), इतर जिल्हा मार्ग (ओडीआर) व ग्रामीण जिल्हा मार्ग (व्हीडीआर) यांची अवस्था अत्यंत खराब असून या रस्त्यांमुळे दिवसेंदिवस अपघाताच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सध्या तिन्ही तालुक्यातील कोणते आणि किती लांबीचे मार्ग अत्यंत खराब आहेत,
(३) तसेच कोणत्या मार्गाची दुरुस्ती गेल्या सहा महिन्यांच्या कालावधीत करण्यात आली, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-१०-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) विषयांकित तिन्ही तालुक्यातील राज्यमार्गाची लांबी १५१.९५ कि.मी. एवढी असून प्रजिमा ची एकूण लांबी १८४.९५ कि.मी. एवढी असून सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत विविध योजनेअंतर्गत रस्ता दुरुस्तीची कामे करुन रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आलेला आहे. या तिन्ही तालुक्यातील इतर जिल्हा मार्गाची एकूण लांबी २२६.६१ कि.मी. व ग्रामीण जिल्हा रस्ते मार्गाची एकूण लांबी २६८.८७ कि.मी. एवढी आहे. उपरोक्त तिन्ही तालुक्यातील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्गातील येणाऱ्या रस्त्याची दुरुस्ती ग्रामविकास विभागाच्या अखत्यारितील जिल्हा परिषदेला प्राप्त होणाऱ्या निधी व निकषाच्या अधिन राहून करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या शिलाई मशीन व प्रशिक्षण योजनेत झालेला गैरव्यवहार**

**(३१) ४५७२६ (२९-०४-२०१६). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) येथील आदिवासी महिलांसाठी राबविण्यात आलेल्या शिलाई मशीन व प्रशिक्षणात १० लाखाचा गैरव्यवहार झाल्याचे दिनांक २३ डिसेंबर, २०१५ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी निरीक्षकांनी महिलांना उत्तम प्रशिक्षण मिळत असून त्यांना स्वयं रोजगारासाठी त्याचा फायदा होणार असल्याचे अहवालात म्हटले असून सदरची योजना राबविली नसतानाही निरीक्षक यांनी दिलेल्या शेऱ्यावर प्रश्न उपस्थित होऊन निरीक्षक यांचा सहभाग असल्याचा आरोप करण्यात आला, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, डोंगरावर राहणाऱ्या आदिवासी महिलांना आजतागायत त्यांच्यासाठी राबविण्यात आलेल्या योजनांची माहिती दूरच पण त्यांच्या नावावर पैसे उकळल्याचेही माहितीच्या अधिकारात उघड झाले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२०-०९-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

दैनिक “सकाळ” मध्ये दिनांक २३-१२-२०१५ रोजी “शिलाई मशीन योजना कागदावरच” ही बातमी प्रसिध्द झाली होती.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) आदिवासी निरीक्षक यांचेवर प्रशासकीय कारवाई करण्याबाबत अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांचेकडे प्रकल्प अधिकारी, पेण यांचेमार्फत प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. तसेच संबंधित संस्थेवर दि.०१-०७-२०१६ रोजी पोलीस स्टेशन, पनवेल येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गणोरी फाटा ते गणोरी या सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे सुरु असलेल्या रस्त्याच्या कामांवर लहान मुले आई-वडिलांसोबत काम करतांना दिसत असल्याबाबत**

**(३२) ४५७८६ (२९-०४-२०१६). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडयातील हिंगोली, नांदेड, वाशिम या जिल्हयातून काही मजूर फुलंब्री तालुक्यात कामासाठी आले असून गणोरी फाटा ते गणोरी या सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे सुरु

असलेल्या रस्त्याच्या कामांवर लहान मुले आई-वडिलांसोबत काम करतांना दिसत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मजुरीच्या मुलांनाही शिकावे असे वाटते पण दुष्काळामुळे आईवडीलांसोबत गाव सोडून कामासाठी वणवण भटकावे लागत आहे त्यामुळे या मुलांचे शिक्षण तसेच आरोग्य धोक्यत आले आहे हे लक्षात घेता शासन त्वरित आवश्यक ती कार्यवाही करणार वा करीत आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-०८-२०१६) :**(१) हे खरे नाही.
तथापि या विषयाबाबत स्थानिक वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द झाली होती.
(२) विषयाधीन कामापासून दूर अंतरावर झाडाखाली लहान मुले आढळली होती.
निविदा शर्तीच्या कलम ४३ (१) नुसार आवश्यक खबरदारी घेण्याच्या सूचना कंत्राटदरांना देण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदेड मधील बंद झालेल्या आश्रमशाळांतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांचे समायोजन झाले नसल्याबाबत**

**(३३) ४६६४८ (२९-०४-२०१६). श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड मधील बंद झालेल्या आश्रम शाळांतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना समायोजित करण्याचे आदेश अप्पर आयुक्त, आदिवासी विकास यांनी दिल्यानंतरही संबंधित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांचे समायोजन झाले नसल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी २७ ऑक्टोबरपासून किनवट येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा संबंधित कर्मचा-यांनी दिला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०५-०८-२०१६) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे आहे.

(३) व (४) नांदेड जिल्हयातील अनुदानित आश्रमशाळा जानापूरी, जांभळा यांची मान्यता शासन स्तरावरुन २०१४ मध्ये रद्द करण्यात आली. जानापूरी आश्रमशाळेतील एकूण २२ पैकी २० कर्मचाऱ्यांचे समायोजन झाले असून दोन कर्मचाऱ्यांची बंधपत्र लिहून न दिल्याने त्यांचे समायोजन झालेले नाही. जांभळा येथील १५ पैकी १२ कर्मचाऱ्यांचे समायोजन पांढरकवडा, कळमनुरी व औरंगाबाद प्रकल्पांतर्गत अनुदानित आश्रमशाळेत करण्यात आले आहे. रिक्त पदे उपलब्ध नसल्यामुळे तीन कर्मचाऱ्यांना रुजू करुन घेण्यात आले नाही. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांच्या दि.२४.४.२०१५ च्या आदेशान्वये गवतवाडी येथील आश्रमशाळांची मान्यता रद्द करण्यात आली असून येथील २२ पैकी २० कर्मचाऱ्यांचे समायोजन किनवट प्रकल्पांतर्गत शासकीय आश्रमशाळेत करण्यात आले आहे. एक कर्मचारी समायोजनाच्या ठिकाणी रुजू झाले नाहीत व पांढरकवडा प्रकल्पांतर्गत समायोजन करण्यात आलेला एक कर्मचारी अतिरिक्त ठरल्याने त्यांना कार्यमुक्त करण्यात आले आहे. आयुक्त आदिवासी विकास, नाशिक यांच्या दि.२२.४.२०१६ च्या आदेशान्वये अर्जापूर आश्रमशाळेची मान्यता रद्द करण्यात आली असून रिक्त पदाचा आढावा घेवून सर्व म्हणजे ११ कर्मचाऱ्याचे समायोजन करण्यात येणार आहे.

---

## वरुड (जि.अमरावती) तालुक्यातील राजुराबाजार परिसरात गेलेल्या पुलगाव आमला या मिलीटरी रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(३४) ४७०२४ (२८-०४-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरुड (जि.अमरावती) तालुक्यातील राजुराबाजार परिसरात गेलेल्या पुलगाव आमला या मिलीटरी रस्त्याची दुरवस्था होवून बाहेर पडलेल्या गिट्टी व दगडांमुळे अनेकांना दुखापत होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-०९-२०१६)** :(१) वरुड तालुक्यातील राजुरा-बाजार परिसरातून गेलेला पुलगांव-आमला राज्यमार्ग क्रमांक २९५ हा रस्ता सा.क्र.२०/०० ते २१/०० मध्ये क्षतीग्रस्त झालेला असून तात्पुरत्या स्वरुपात सदर लांबीमधील मोठे खड्डे भरण्यात आलेले आहेत.

(२) सदर क्षतीग्रस्त लांबीचे काँक्रीटीकरण करणेबाबतचा रु.३००.०० लक्ष किंमतीचा प्रस्ताव सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात मंजुर असुन सविस्तर अंदाजपत्रक तयार करणे सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भोकरदन व वाकडी (जि.जालना ) या रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत**

**(३५) ४७३५० (३०-०४-२०१६). श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोकरदन व वाकडी (जि.जालना) या सहा किलोमीटर रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असून याबाबत चौकशी करण्याची मागणी तेथील ग्रामस्थांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे माहे जानेवारी, २०१६ च्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास,चौकशीनुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०१-०८-२०१६) :** (१) प्रश्नाधीन कामाची तक्रार सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय, दगडवाडी यांनी दि.३१/०३/२०१६ अन्वये अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांच्याकडे केली आहे.

(२) व (३) याबाबत प्राथमिक चौकशी अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांचेस्तरावर चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात सन २०१२ मध्ये आदिवासी विकास विभागाकडून करण्यात आलेल्या खरेदीत झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत**

**(३६) ४७६५७ (२९-०४-२०१६). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१२ मध्ये आदिवासी विकास विभागाकडून करण्यात आलेल्या खरेदीत झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी दिनांक १५ एप्रिल, २०१४ मध्ये गठीत केलेल्या समितीला दिड वर्षापासून अधिक कालावधी होऊनही सदर गैरव्यवहाराची अद्यापी चौकशी पूर्ण झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गैरव्यवहाराची तातडीने चौकशी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०१-०९-२०१६) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

आदिवासी विकास विभागातील विविध योजनांमध्ये सन २००४-०५ ते सन २००८-०९ या कालावधीमधील झालेल्या कथित गैरव्यवहारासंबंधी चौकशी संदर्भातील जनहित याचिकेच्या

अनुषंगाने शासन निर्णय दि.१५/०४/२०१४ अन्वये मा.श्री.एम.जी.गायकवाड, सेवानिवृत्त न्यायाधीश, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या पाच सदस्यीय समितीमार्फत सर्व आश्रमशाळा/वसतीगृहे व प्रशासकीय कार्यालयांकडून माहिती संकलित करणे व साक्षीदार तपासणीची कार्यवाही करण्यात येत असल्याने चौकशी पुर्ण होण्यास काही कालावधी लागणार आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खेड (जि.पुणे) तालुक्यातील ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजनेंतर्गत विकासकामे अपूर्ण अवस्थेत असल्याबाबत**

**(३७) ४७७२८ (२९-०४-२०१६). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेड (जि.पुणे) तालुक्यातील ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजनेंतर्गत सन २०१५-१६ साली प्रत्येक विकास कामांना अल्प निधी उपलब्ध करून दिला जात असल्याने विकासकामे अपूर्ण अवस्थेत असल्याचे माहे फेब्रुवारी २०१६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजनेच्या मानंकामध्ये शासन निर्णय दिनांक २६ जून, २००७ अन्वये निधीची मर्यादाही महागाई निर्देशांकानुसार दुप्पट करण्यात यावी याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ८ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मा.मुख्यमंत्री यांचेकडे मागणी केली आहे, हे हि खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने महागाई निर्देशांकानुसार निधीत वाढ करणेबाबत शासनाने काय निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२०-०९-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कसारा (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील मकवाती पुल वाहतुकीसाठी धोकादायक बनल्याबाबत**

**(३८) ४७८०७ (२९-०४-२०१६). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कसारा (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील मकवाती पुल वाहतुकीसाठी धोकादायक झाला असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ च्या दुसऱ्या सप्ताहात उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाची शासनामार्फत पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार सदर पुलाची तातडीने दुरुस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-१०-२०१६) :** (१) नाही.

शहापूर तालुक्यात मकवाती पुल असा कोणताही पुल अस्तित्वात नाही. तथापि प्रजिमा-५३ वर मोखावणे येथे कमानी पूल अस्तित्वात आहे.
(२) व (३) सदर मोखावणे येथील कमानी पूलाची पाहणी मार्ग व पुल विभाग, ठाणे यांच्यामार्फत १० वर्षापूर्वी करण्यात आली असता, सदरील पूल अवजड वाहतुकीसाठी धोकादायक असल्याने १० वर्षापूर्वी पासून अवजड वाहतुकीस बंद आहे.

या रस्त्यासाठी अन्य जवळचा व चांगल्या दर्जाचा रस्ता उपलब्ध असून या रस्त्यावरुन वाहतूक सुरळीतपणे चालू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शहापूर तालुक्यातील (जि.ठाणे)तहसील कार्यालयाच्या प्रशासकीय भवनाला मंजूरी मिळूनही अद्याप काम सुरु न केल्याबाबत**

**(३९) ४७८२१ (२०-०४-२०१६). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर तालुक्यातील (जि.ठाणे) तहसील कार्यालयाच्या प्रशासकीय भवनाला सन २००९ मध्ये प्रशासकीय मंजूरी देण्यात आलेली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ६ वर्ष होऊनही निधी न मिळाल्यामुळे कोणतेच काम सुरु झाले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, प्रशासकीय भवनचे काम सुरु करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ६ जुलै, २०१५ रोजी पुन्हा लेखी निवेदनाद्वारे मा.महसूल मंत्री यांच्याकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(६) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?
(७) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-१०-२०१६) :** (१) हे खरे आहे.
(२) खरे आहे.
(३) सदर इमारत बांधणेसाठी जागा उपलब्ध नसल्याने काम सुरु करण्यात आले नाही.
(४) खरे आहे.
(५) या अनुषंगाने जिल्हाधिकारी, ठाणे यांना शासनास प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दि.२४.०८.२०१५ च्या महसूल विभागाच्या पत्रान्वये देण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौ.तिर्लोट ते मौ.पडेल (ता.देवगड, जि.सिंधुदूर्ग) येथील प्रमुख जिल्हा मार्ग क्रमांक ८ या रस्त्याचे नुतनीकरण व डांबरीकरणासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४०) ४८२१५ (०४-०५-२०१६). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौ.तिर्लोट ते मौ.पडेल (ता.देवगड, जिल्हा सिंधूदुर्ग येथील प्रमुख जिल्हा मार्ग क्रमांक ८ या रस्त्याचे नुतनीकरण व डांबरीकरण करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी व ग्रामस्थांनी मा.ग्रामविकास मंत्री, मा.राज्यमंत्री, मा.ग्रामविकास तथा पालकमंत्री सिंधुदूर्ग तसेच मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे अनुक्रमे २० जानेवारी २०१५, दिनांक ३ फेब्रुवारी २०१५ व दिनांक २३ ऑक्टोबर, २०१५ रोजी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-१०-२०१६) :**(१) होय.
(२) प्रश्नांकित रस्त्याच्या कि.मी. २/५०० ते ४/७०० या लांबीत रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागाचे नुतनीकरण करण्याचे काम माहे मार्च २०१६ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे. कि.मी. ०/१०० ते २/१०० व कि.मी. ७/८०० ते ८/७०० या लांबीतील भागात डांबरी पृष्ठभागाचे नुतनीकरण करण्याची कामे मंजूर असून निविदा स्तरावर आहेत. रस्त्याच्या कि.मी. ४/७०० ते ६/४५० या लांबीत सन २०१६-१७ मध्ये गट “अ” अंतर्गत डांबराने खड्डे भरण्याचे काम मंजूर असून, कि.मी. ५/७०० ते ६/४५० या लांबीतील काम पूर्ण झाले आहे.
सद्य:स्थितीत प्रश्नांकित रस्त्याच्या काही लांबीत अतिवृष्टीमुळे पडलेले खड्डे जांभ्या खडीने भरण्याचे काम प्रगतीत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर जिल्हयातील डहाणू बोर्डी समुद्रकिनारा मार्गावर**
**खड्डे पडून दुरावस्था झालेली असल्याबाबत**

**(४१) ४८९२२ (२९-०४-२०१६). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील डहाणू येथे निसर्गरम्य सागरी किनारा व बोर्डी पर्यटन केंद्र नावारुपाला आलेले असता नरपड, चिखले, टोकेपाडा, घोलवड, बोर्डी, झाई या सागरी मार्गावर पर्यटक, रहदारीचे व वाहतुकीचे प्रमाण वाढल्याने वाहतुक कोंडी, अवैध वाहतुक तसेच रस्त्यांवर खड्डे पडून दुरावस्था झालेली असून सार्वजनिक बांधकाम विभागाचे याकडे पूर्णत: दुर्लक्ष झालेले आहे हे दिनांक ६ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे ,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-१०-२०१६) :**(१) नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शहापूर तालुक्यात उंबरमाळी व कसारा स्थानकादरम्यान संरक्षक भिंत बांधण्याबाबत**

**(४२) ५५४५७ (२४-०८-२०१६). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर तालुक्यात उंबरमाळी व कसारा स्थानका दरम्यान पोल क्र.११६/१९ व पोल क्र.११६/३१ दरम्यान मुंबई व नाशिक महामार्ग व रेल्वे ट्रॅक यात केवळ चार फूट अंतर असून या ठिकाणी सुरक्षेसाठी ना बॅरिकेड्स आहेत ना संरक्षक भिंत त्या परिणामी महामार्गावरुन नाशिकच्या दिशेने जाणाऱ्या चालकांचा ताबा सुटुन वाहन रेल्वे महामार्गावर गेले तर मोठी दुर्घटना घडू शकत असल्याचे माहे मे, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याठिकाणी शासनाने वेळीच लक्ष देवुन येथे तातडीने संरक्षक भिंत बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-१०-२०१६) :**(१) व (२) नाही, हे खरे नाही.

शहापूर तालुक्यातील उंबरमाळी व कसारा स्थानकादरम्यान पोल क्रमांक ११६/३५ ते ११६/५१ दरम्यान महामार्ग व रेल्वे ट्रॅक यामध्ये अनुक्रमे १३ मी. व २२ मी. अंतर आहे. या ठिकाणी रेल्वेने दगडी बांधकामात भिंत बांधली आहे तसेच पोल क्र.११६/१९ ते पोल क्र.११६/३१ मध्ये मुंबई व नाशिक महामार्ग व रेल्वे ट्रॅक यामध्ये अनुक्रमे ३५ मी. व १८ मी. एवढे अंतर असून या ठिकाणी रेल्वे प्रशासनातर्फे ७५ मी. मातीचा बांध बांधण्यात आलेला आहे. त्यामुळे महामार्गावरुन नाशिकच्या दिशेने जाणाऱ्या वाहनांना दुर्घटना होण्याची शक्यता नाही तसेच अधिकच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून महामार्गावर भरधाव वेगाने जाणाऱ्या वाहनांचा अपघात टाळण्यासाठी १०० मीटर लांबीमध्ये W टाईप मेटल बिम क्रॅश बॅरिअर बसविण्याबाबत सवलतकार मे.एमएनईएल यांना सूचना देण्यात आल्या आहेत असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नाशिक यांनी कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंदगड तालुक्यातील (जि.कोल्हापूर) येथील मुंगरवाडी, लिंगनुर रस्ता प्रजिमा मार्ग क्र. ६३ वरील रस्त्याच्या कडेस असणाऱ्या विहिरीला संरक्षण भिंत बांधण्याबाबत**

**(४३) ५७२७७ (२४-०८-२०१६). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंदगड तालुक्यातील (जि.कोल्हापूर) येथील मुंगरवाडी, लिंगनुर रस्ता (प्रजिमा मार्ग क्र.६३) वरील रस्त्याच्या कडेस असणाऱ्या विहिरीला संरक्षण भिंत बांधण्याची मागणी अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग कोल्हापूर यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३१ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-१०-२०१६) :**(१) प्रश्नात नमूद मागणी अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर या कार्यालयास प्राप्त नाही.

(२) प्रश्नांकित रस्त्याच्या कि.मी. १०/५०० व १०/६०० मध्ये रस्त्याच्या कडेस दोन विहिरी असून त्या रस्त्याच्या मध्यापासून अनुक्रमे ८ मी. व १० मी. अंतरावर आहेत. हि विहिर असल्याबाबतची आगाऊ सुचना देणारे फलक तसेच संरक्षक कठडे बांधण्याच्या कामांना मंजूरी प्रदान करण्यात आली आहे. सदर कामाच्या निविदा बोलावून काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक येथील शासकीय वसाहतीच्या इमारतींची झालेली दुरावस्था**

**(४४) ५७३४९ (२४-०८-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) नाशिक येथील शासकीय वसाहतीच्या इमारतींची दुरावस्था झाली असून तिथे तुटलेले दरवाजे, फुटलेल्या काचा, तडे गेलेल्या भिंती, तुंबलेले ड्रेनेज आणि सर्वदूर पसरलेली अस्वच्छता असल्याचे माहे मे, २०१६ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शासकीय वसाहतीची दुरुस्ती करण्यासंदर्भात वारंवार तक्रारी करुनही कोणतीच दुरुस्ती करण्यात आली नाही हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या शासकीय वसाहतींची तातडीने दुरुस्ती करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-१०-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

निधीच्या अनुषंगाने व मागणीनुसार दुरुस्ती करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलडाणा जिल्हा मुख्यालय असलेल्या प्रशासकीय इमारतीच्या विस्तारीकरणाबाबत**

**(४५) ६०१२२ (२४-०८-२०१६). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा जिल्हा मुख्यालयात शासनाच्या विविध कार्यालयांसाठी एकच प्रशासकीय इमारत उपलब्ध असल्याने प्रशासकीय इमारत अपूरी ठरत असल्याने अनेक शासकीय कार्यालय भाड्याच्या इमारतीत अथवा इतर ठिकाणी सुरू आहेत, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, सर्व शासकीय विभाग एकाच ठिकाणी नसल्याने नागरिकांची गैरसोय होत असुन शासनास जागा भाड्यापोटी अनावश्यक खर्च करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रशासकीय इमारतीच्या विस्तारीकरणाची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींकडून करण्यात आलेली अाहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शासन विस्तारीकीकरण करणार आहे काय व त्यासाठी किती तरतूद उपलब्ध करून दिली जाणार आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-१०-२०१६) :**(१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) निधीच्या उपलब्धतेनुसार विस्तारीकरणाची कामे हाती घेण्यात येतील.

---

**रायगड जिल्हयातील राष्ट्रीय महामार्गावरील नागोठणे आणि रोहा या दोन शहरांना जोडणा-या भिसे खिंडीतील रस्त्यावरील तुटलेले संरक्षक कठडे आणि वाढलेल्या झुडपामुळे अपघाताचा धोका निर्माण झाल्याबाबत**

**(४६) ६०१३८ (२४-०८-२०१६). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील राष्ट्रीय महामार्गावरील नागोठाणे आणि रोहा या दोन शहरांना जोडणा-या भिसे खिंडीतील रस्त्यावरील तुटलेले संरक्षक कठडे आणि धोकादायक वळणावरील वाढलेल्या झुडपामुळे अपघाताचा धोका निर्माण झाल्याचे नुकतेच माहे मे,२०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले,

(३) तदनुसार शासनाने काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-१०-२०१६) :**(१) नाही.

(२) व (३) सदर अपघात प्रवण भागात वाढलेली झाडे व झुडपे पावसाळा सुरु होण्यापूर्वी काढण्यात आलेली आहेत. या भागातील दुरुस्तीचे काम मार्च-२०१६ चे अर्थसंकल्पामध्ये मंजूर आहे. या कामात संरक्षक भिंत बांधणे व क्रॅश बॅरीअर बसविणे या बाबींचा अंतर्भाव आहे. काम सद्या निविदा स्तरावर असुन ते मार्च-२०१७ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक-कळवण रस्त्यावर कादवा नदीवर असलेला नव्यानेच बांधलेला पूल धोकादायक बनला असल्याबाबत**

**(४७) ६०६४३ (२४-०८-२०१६). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक-कळवण रस्त्यावर कादवा नदीवर असलेला नव्यानेच बांधलेला अवनखेड पूल वाहतूकीस खुला करण्यात आला असून हा पूल धोकादायक बनला असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, असमतोल दुभाजकांमुळे वाहने नदीत जाण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पुलाबाबत शासनाने दखल घेऊन या असमतोल दुभाजकांची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०७-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

पूलाचे बांधकाम चालू असताना सुरक्षिततेच्या दृष्टीने उपाययोजना करण्यात आली होती.

(३) नवीन पुलाचे बांधकाम पूर्ण झाल्यावर जुना व नवीन दोन्ही पुलाच्या मधील ३.०० मीटर जागेत सिमेंट कॉंक्रीटचे दुभाजक बांधण्यात आले असून वाहतूक सुरक्षितपणे चालू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्याच्या आदिवासी विकास विभागाने आदिवासी व शेतक-यांकडून सन २००९ ते २०१४ या पाच वर्षांच्या कालावधीत खरेदी केलेला भात भरडाईविना पडून राहिला असल्याबाबत**

**(४८) ६११५१ (१५-०७-२०१६). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या आदिवासी विकास विभागाने आदिवासी व शेतक-यांकडून सन २००९ ते २०१४ या पाच वर्षांच्या कालावधीत खरेदी केलेला भात भरडाईविना पडून राहिला असल्याचे माहे मे, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात मिल मालकांना दंड करण्याऐवजी १६० कोटींचा गैरव्यवहार झाला असून आदिवासी विकास महामंडळाच्या वरीष्ठ अधिका-यांना ताज्या तपासणी अहवालात दोषी धरण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील अहवालात नमूद दोषी अधिका-यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२०-०९-२०१६) :**(१) हे अंशतः खरे आहे.

आदिवासी विकास महामंडळाकडून सन २००९-१० ते २०१३-१४ या पाच वर्षाच्या कालावधीत वर्षनिहाय धानाची भरडाई करण्यात आलेली आहे. मात्र त्या त्या वर्षी धान/तांदूळ वाहतुकदर मंजुर न होणे, यापुर्वीच्या वाहतुकदरा पेक्षा सुमारे ४०% इतके दर कमी निश्चित केल्यामुळे तसेच इतर राज्यांपेक्षा धान भरडाईचे दर कमी असल्याने राईस मिलर्सकडून भरडाईसाठी पुरेसा प्रतिसाद मिळू शकला नसल्याने धान भरडाई विना शिल्लक राहिले.

भरडाई करीता शिल्लक राहिलेल्या धानाची संबंधीत जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समिती मार्फत ई लिलावाद्वारे विक्रीची कार्यवाही माहे एप्रिल, २०१४ पर्यंत करण्यात आलेली आहे.

(२) व (३) धान भरडाईला देतांना राईस मिलर्सकडून पुरेशा प्रमाणात बँक गॅरंटी घेणे आवश्यक असतांना तत्कालीन प्रादेशिक व्यवस्थापक, भंडारा/गडचिरोली/अहेरी यांनी बँक गॅरंटीपेक्षा जादा धनाची उचल देवून अनियमितता केल्याप्रकरणी त्यांची विभागीय चौकशी लावण्यात आली आहे. त्यामुळे मिल मालकांना रुपये १६० कोटीची निधी वाटप करण्यात आलेला नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील आदिवासी विकास विभागाचे अप्पर आयुक्तांच्या अखत्यारीतील अनुदानित आश्रमशाळांना परिरक्षण अनुदान वेळेवर देण्याबाबत**

**(४९) ६१८०८ (१२-०८-२०१६). श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी विकास विभागाचे अप्पर आयुक्तांच्या अखत्यारीतील अनुदानित आश्रमशाळांना परिरक्षण अनुदानाचा सन २०१६ मध्ये १ ला व २ रा हप्ता देण्यात आला आहे काय,

(२) सदरहू परिरक्षण अनुदान वेळेवर देण्यात येत नसल्याने संभाव्य उपासमार टाळण्यासाठी वेळेवर देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केलेली आहे,

(३) तसेच अनुदानित आश्रमशाळेतील सुरक्षा रक्षकांना कामगार विभागाने रु. ९५०० मासिक मानधन देण्याची शिफारस केेलेली असतांना रु. ५००० फक्त देण्याबाबत शासनाने दिनांक ८ जून २०१६ रोजी शासन निर्णय जाहिर केला आहे ,हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या अल्प मानधनावर सुरक्षा रक्षक काम करण्यास तयार नसल्याने सदरहू मानधन वाढविण्याबाबत शासनची भूमिका काय आहे?

**श्री. विष्णु सवरा (०६-०९-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे.

(२) नाशिक व कळवण प्रकल्पातील अनुदानित आश्रमशाळा परिरक्षण अनुदान मंजुरी कार्यवाहीत आहे. उर्वरीत सर्व प्रकल्पातील अनुदानित आश्रमशाळांना परिरक्षण अनुदान मंजुरी झाली आहे. अनुदान अदायगी करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) सुरक्षा रक्षकांचे मानधन रु.५०००/- यामध्ये वाढविण्याचा कोणताही प्रस्ताव सध्या शासनाच्या विचाराधीन नाही.

---

**टेभुर्णी ते करमाळा जातेगांव या दरम्यानच्या ६५ कि.मी. अंतराच्या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम संथगतीने होत असल्याबाबत**

**(५०) ६३७४४ (२४-०८-२०१६). श्री.सिध्दराम म्हेत्रे (अक्कलकोट), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील करमाळा तालुक्यातील टेभुर्णी ते करमाळा जातेगांव या दरम्यानच्या ६५ कि.मी. अंतराच्या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम संथगतीने होत असूनही याकडे संबंधित जिल्हा बांधकाम विभागाने दुर्लक्ष केले असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कारणास्तव या रस्त्यावरुन प्रवास करताना वाहन चालकांचा जीव धोक्यात आहे हे लक्षात घेता शासन त्वरीत आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,
(३) नसल्यास यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१७-१०-२०१६)** :(१) हे खरे नाही.
(२) व (३) ठेकेदार दुरुस्तीचे काम आवश्यक त्या प्रमाणात करत नसल्यामुळे ठेकेदारावर दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. ठेकेदाराचे अनामत रकमेतून (बँक गॅरंटी) दुरुस्तीचे काम करणेबाबत निविदा प्रक्रिया प्रगतीत आहे.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.